Vol 4 Issue 4 May 2014

ISSN No : 2230-7850

International Multidisciplinary Research Journal

# Indian Streams Research Journal

Executive Editor
Ashok Yakkaldevi

Editor-in-Chief
H.N.Jagtap

## Welcome to ISRJ

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.


## International Advisory Board

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest,Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## Editorial Board

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University


**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Indian Streams Research Journal
ISSN 2230-7850
Volume-4 | Issue-4 | May-2014
Available online at www.isrj.net

# *दुर्गा भागवत यांचे 'पैस' मधील विठ्ठल विषयक चिंतन*

*सुशीला पिंजारी*

माध्यमिक आश्रमशाळा व ज्युनियर कॉलेज, वाखरी. ता. पंढरपूर, जि. सोलापूर.

***सारांश :-*** प्राचीन काळापासून भारतीय लोकमानस विविध लोकदैवतांच्या आधाराने व त्यांच्या कृपा आशीर्वादाने जीवन जगत आहे. कोणत्याही घटनेसाठी आपण निमित्तमात्र असतो, करता करविता देव असतो, अशी लोकमानसांची श्रद्धा आहे. भगवान शिवशंकर, श्रीकृष्ण, खंडोबा, बिरोबा, विठ्ठल, सिद्धनाथ, जोतीबा या पुरूष लोकदैवतांसह अनेक मातृदैवतांनी महाराष्ट्रातील लोकमानसांचे लोकजीवन प्रेरित व नियंत्रित केले आहे. या लोकदैवतांकडे लोकमानस केवळ भक्तीभाव म्हणून पाहत नाही. ही लोकदैवते त्यांच्या जीवनाचा अविभाज्य घटक बनून राहिली आहेत. या लोकदैवतांनीच लोकमानसांचे मन नीतिमान, भक्तिमान व शक्तिमान बनविले आहे. पंढरीचा विठ्ठल हा महाराष्ट्रातील लोकमानसांच्या मनावर व जीवनावर अधिराज्य गाजविणारा लोकदेव आहे.

### *प्रस्तावना :*

महाराष्ट्राची दक्षिण काशी म्हणून तीर्थक्षेत्र पंढरीचा उल्लेख मोठ्या भक्तीभावाने केला जातो. महाराष्ट्रासह संपूर्ण भारतातील सर्व जाती–धर्मांच्या लोकांमध्ये या तीर्थक्षेत्राविषयी व तिथले लोकदैवत विठ्ठलाविषयी अपार प्रेम व उत्कट भक्तीभाव आहे. पवित्र अशा पंढरी नगरीला 'भूवैकुंठ' असे संतांनी संबोधले आहे. पंढरीरूपी हे भूवैकुंठ म्हणजे भक्ती आणि मुक्तीचे साक्षात माहेरघर असल्याचा श्रद्धाभाव प्रत्येक वारकऱ्यांच्या मनात आहे.

### *पंढरपूर व विठ्ठल : प्राचीन इतिहास*

भीमा नदीच्या काठावर तीर्थक्षेत्र पंढरपूर वसले आहे. पंढरपूर क्षेत्रास विविध काळात 'पंडरपूर, पंडरी, पांडुंरंगपूर, कुंडलिकपूर, पंडरीपूर, फागणीपूर, पांडरिक क्षेत्र, पंडरगे, पांडुरंग पल्ली' अशी नावे दिलेली आढळतात.[1] आज मात्र पंढरपूर हेच सर्वांना परिचित असलेले नाव रूढ झाले आहे.

पंढरपूरची भीमा म्हणजे चंद्रभागा या नदीचा उल्लेख 'श्रीमद्‌भागवत' व 'महाभारत' या ग्रंथांमध्ये आला आहे. याचाच अर्थ पंढरपूर व भीमा ही 'श्रीमद्‌भागवत' व 'महाभारत' काळात प्रसिद्ध असल्याचे स्पष्ट होते.[2] यावरून पंढरपूर हे प्राचीन गाव आहे व ते महाभरतकालीन होते हे सिद्ध होते. पंढरीचा विठ्ठल हा लाखो वारकऱ्यांचा लाडका लोकदेव आहे. तो मूळचा कानडी भागातला म्हणजे कर्नाटकी आहे. विठ्ठल हा अनेक अवतारांचा समन्वय आहे, असे डॉ.रा.चिं.ढेरे यांचे मत आहे. विठ्ठल मूळचा कोण आहे ? व तो तो कुठला आहे ? याविषयी अभ्यासकांत अनेक मत–मतांतरे आहेत.

श्री विठ्ठल या दैवताबद्दल तर तो लोकदेव होता, गोपाल जनांचा देव होता, विरक्कल ( विरंगळ–विठोबा ) होता, वीरभद्र होता–मूर्तीस्वरूप व लिंगस्वरूप असा द्विरूप होतो तर प्रत्यक्ष शंकराचेच ( महादेवाचे ) झालेले उन्नयन नव्हे रूपांतर होते. इथंपर्यंत विविध मते पुढे आली आहेत. पण त्यातून मनाचे समाधान होईल असे उत्तर सापडत नाही.[3] श्री विठ्ठलाचे वैष्णवीकरण होण्याची ही संतपरंपरेतील प्रक्रिया तशी सूक्ष्म नसून स्थूल आहे. त्यांनी विठ्ठलाला काटेकोरपणे विष्णू बनविले नाही की श्रीकृष्ण बनविले नाही. त्यांच्या अध्यात्माच्या दृष्टीने तो 'अवतारांची राशी' असूनही सर्व अवताराहून वेगळा आहे. तर आपल्या भौतिक शोधदृष्टीने तो विष्णू, कृष्ण, शिव, बुद्ध अन् जिन या रूपांचा स्वीकार करीत असला तरी मूळचा केवळ लोकमानसातील विठ्ठल आहे, लोकदेव विठ्ठल आहे.[4]

श्री विठ्ठल हा मूळचा गोपाळांचा देव आहे. दक्षिणेत संचार करणाऱ्या अथवा अर्धसंचारी व अर्धस्थिर अशा स्थितीत जगणाऱ्या गवळी–गोल्ल–कुरूब यासारख्या गायी–गुरे, शेळ्या, मेंढ्या पाळणाऱ्या जमातींचा देव आहे.[5] डॉ.रा.चिं.ढेरे यांचे विठ्ठल विषयक संशोधन आज सर्वमान्य होताना दिसत आहे.

दुर्गा भागवत या नामांकित लेखिका व लोकसाहित्याच्या व्यासंगी संशोधिका म्हणून महाराष्ट्रास सुपरिचित आहेत. महाराष्ट्रातील लोकांप्रमाणेच दुर्गाबाईंच्या मनातही विठ्ठलाविषयी अपार श्रद्धा आहे. विठ्ठल, श्रीकृष्ण, गौतमबुद्ध व येशूख्रिस्त ही महामानवरूपी दैवते दुर्गांबाईंच्या अभ्यासाचा व संशोधनाचा विषय बनून राहिल्याचे त्यांच्या 'पैस' या ललितलेखसंग्रहातून प्रकर्षाने जाणवते. 'पैस' मधील 'पंढरीचा विठोबा' या नितांत सुंदर लेखात दुर्गाबाईंनी संतांच्या ऐतिहासिक परंपरेतील विठ्ठलापेक्षा लोकपरंपरेतील विठ्ठल कसा वेगळा आहे, हे धनगरी

कथागीतांच्या आधारे स्पष्ट केले आहे. पंढरपूरच्या विठ्ठलाचे मूळ गोपजनीय म्हणजे धनगरी परंपरेतील असल्याची नवी मांडणी करण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे. दुर्गाबाईंचे विठ्ठल विषयक मुक्त चिंतन लालित्य व संशोधनाच्या दृष्टीने खूपच मौलिक वाटल्यानेच प्रस्तुत लेखरूपी शब्दप्रपंच केला आहे.

## *दुर्गाबाईंचे विठ्ठल व पंढरपूर विषयीचे नाते*

महाराष्ट्राचे अध्यात्मिक भक्तीपीठ श्रीक्षेत्र पंढरपूर नगरी व येथील लोकमानसांचा लाडका लोकदेव म्हणजे विठ्ठल ! संतांच्या साहित्य परंपरेने व लोकमानसांच्या लोकसाहित्यरूपी मौखिक परंपरेने विठ्ठलाचे घडविलेले आगळेवेगळे दर्शन पाहून दुर्गाबाई आशचर्यचकीत होतात. या दोन्ही परंपरेच्या आकलनातून दुर्गाबाईंना भावलेला व दिसलेला विठ्ठल त्यांनी 'पंढरीचा विठोबा' या लेखात शब्दरूप केला आहे.

पंढरपूरच्या विठ्ठलाचे मूळ गोपजनीय धनगरी परंपरेत असल्याचा विचार व्यक्त करताना त्या लिहितात, 'तो मूळचा दक्षिणेकडचा, पण पंढरपुरात येऊन जो विटेवर उभा राहिला तो कायमचाच. का आला तो पंढरपूरात ? परंपरा म्हणते, पुंडलिकामुळे; पण धनगर म्हणतात की, तो आला पदुबाईमुळे. कोण ही पदुबाई ? पदुबाई ही विठोबाची मूळची राणी नि रूक्मिणी ही तिची छाया अशी त्यांची समजूत. तिची कथा ऐकली नि मला पंढरपुरला जायची ओढ लागली.[6] येथे दुर्गाबाईंनी विठ्ठल पंढरीस येण्याची दोन सूत्रे सांगितली आहेत. त्यातील पहिले सूत्र संत परंपरेचे आहे तर दुसरे सुत्र लोकसाहित्यातील लोकमानसरूपी लोकपरंपरेचे आहे. संतपरंपरा सांगते, विठ्ठल पुंडलिकामुळे पंढरपूरला आला. तर लोकमानस परंपरा सांगते, तो पदुबाईमुळे पंढरपूरला आला. या दोन्ही परंपरेतील सत्याचा वेध घेण्यासाठी दुर्गाबाईंनी प्रस्तुत लेख लिहिला आहे.

पंढरपूर हे दुर्गाबाईंचे मूळ गाव आहे. त्यामुळे पंढरपूरविषयी त्यांच्या मनात वेगळी ओढ आहे. तेथे त्यांचा जुना वडिलोपार्जित वाडा आहे. दुर्गाबाईंच्या पांडुरंग नामक पणजोबांनी त्यांच्या पत्नीस क्रूर व अन्यायाची वागणूक दिली. त्यातच तिचा मृत्यू झाल्याचे दुर्गाबाईंच्या आजोबांनी पाहिले. आईच्या मृत्यूमुळे त्यांच्या आजोबांनी रक्तलांच्छित भूमीत पाय ठेवणार नाही, अशी शपथ घेऊन ते घर कायमचेच सोडले. बापाचे पांडुरंग हे नाव ही टाकून दिले. मूर्तीरूपी विठ्ठलाला वार्धक्यात ते कधी सामोरे गेले नाहीत. परंतु ज्ञानेश्वर, तुकारामांच्या ग्रंथातील विठोबा त्यांनी जवळ केला. आजोबांच्या दुःखित मनाचे परिवर्तन दुर्गाबाईंनी हृदयस्पर्शीपणे मांडले आहे. पंढरपूरपासून तुटल्यामुळे व अध्यात्माच्या अभावामुळे त्यांना पंढरीविषयी तितकीशी ओढ राहिली नव्हती. पुढे सांप्रदायिक ग्रंथांच्या वाचनाने व विठ्ठलाविषयक मिळालेल्या सुंदर लोककथांमुळे त्यांना वेगळाच विठ्ठल व पंढरपूर दृष्यित झाले. अभ्यासाच्या निमित्ताने त्यांचे पंढरपूरला जाणे घडले.

## *संतांच्या ऐतिहासिक परंपरेतील विठ्ठल विषयक चिंतन*

पुंडलिकामुळे विठ्ठल पंढरपूरला आला. संतांचा ग्रंथबद्ध विठ्ठल या ऐतिहासिक सूत्राविषयी दुर्गाबाई लिहितात, 'ऐतिहासिक भूमिका सरावाने सोडता येत नव्हती; सोडणे इष्टही नव्हते. कारण, बौद्धिक जीवनाचा सांधाच इथे ढासळू पहात होता. ऐतिहासिक दृष्टी हा एकच काल आज नि उद्याला जोडणारा दुवा होता. भीमा किंवा भीमरथी ही महाभारतकालीन प्राचीन पवित्र नदी आहे. पण पंढरपूर नि तिथला पांडुरंग मात्र पुष्कळच नंतरचा असल्याचे दुर्गाबाई सांगतात. इतर संप्रदायातील गोडवा, वैराग्य व भक्तीभाव हे गुण इतर संप्रदायापेक्षा वारकरी संप्रदायात जास्त आहेत. विठ्ठलाच्या पूजाअर्चेत बडिवार नाही. गरीब–श्रीमंत, जात–पात, स्त्री–पुरूष असा भेदभाव नाही.क महाराष्ट्राच्या सांस्कृतिक एकिकरणाची उत्कृष्ट प्रथा त्यांना पंढरीत दिसते.

संतांची साधेपणाची भक्ती, लेकुरवाळा व कुटुंबवत्सल भक्तप्रिय कमरेवर हात ठेवलेला आणि पुंडलिकाच्या विटेवर अठ्ठावीस युगे उभा राहिलेला विठ्ठल दुर्गाबाईंना भावतो. संतांनी विठ्ठलाचा प्रेमाने केलेला विठूमाऊली, विठाबाई, विठ्ठले असा उल्लेख त्यांना अधिक भावतो. महादेव, बालाजी, कृष्ण हे सारे बाप आहेत, प्रियकर आहेत, पती व भाऊ आहेत. परंतू केवळ विठ्ठल एकटाच मातृ व पितृरूपी देव आहे. जनाबाईंनी अतीव प्रेमाने विठ्ठलाला दिलेल्या शिव्याही त्यांना वावग्या वाटत नाहीत.

प्रियकर–प्रेयसीची मधुरा भक्तीची भावना विठ्ठल संप्रदायात क्वचितच आढळते. संतांचा विठ्ठल कुटुंबवत्सल, माता पितरांच्या भूमिकेत त्यांना भेटला. कृष्णाच्या लीला, क्रीडा व प्रेमरंग यांचा विठ्ठल संप्रदायात बडिवार नाही. विठ्ठल हा बुद्ध, शिव व विष्णूरूपी अवतार मानला आहे.

विठ्ठलाच्या कथेत शिव आणि विष्णू यांचे ऐक्य आलेले आहे. कर्नाटक आणि महाराष्ट्र त्याप्रमाणे आंध्र यांच्या एकात्म संस्कृतीचे पूर्ण प्रतीक म्हणजे पंढरीचा विठोबा. या भिन्न प्रांतात, भाषा भिन्न असूनही त्यांची संस्कृती एक आहे. संस्कृतीच्या जगातील हे एक मोठे नवल आहे. हे संस्कृतीचे एकात्म्य या तिन्ही भागातील डोंगराळ ग्रामविभागातल्या गोप संस्कृतीतून स्फुरलेले आहे. विठ्ठल कानडा आहे. तो गवळी आहे. काळी घोंगडी पांघरतो. राही–रूक्मिणी त्याच्या दोन बायका. राही किंवा राधा इतरत्र कृष्णाची प्रेयसी असते; महाराष्ट्रात मात्र ती त्याची बायको झाली. पण विठ्ठलाची खरी राणी रूक्मिणी. पण तरीही हा काही तिच्यात गुरफटलेला नवरा नाही.[7]

वारकरी संप्रदायातील संतांनी 12व्या शतकापासून विठ्ठलाचे गोपजनीय धनगरी मूळ दुर्लक्षून त्यांचे शैव व वैष्णव रूपात अधिक उदात्तीकरण केले. वारकरी संतांचे हे कार्य धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय अशा सर्वच पातळीवर वेगवेगळ्या प्रकारचे आहे. एका ग्रामदैवताला प्रादेशिक पातळीवर पोहोचविण्याचे कार्य हे विठ्ठलाच्या उन्नयनामध्ये त्यांनी साधले.[8]

## *लोकपरंपरेतील विठ्ठल विषयक चिंतन*

धनगरांची विठ्ठल पदूबाई यांची विचित्र विरह मांडणारी कथा दुर्गाबाईंना मिळाली. धनगरी परंपरेचे दुसरे सूत्र दुर्गाबाईंना महत्त्वाचे वाटते. म्हणूनच त्यांनी या सूत्रावर अधिक प्रकाश टाकणारी कथा सांगितली आहे, ती कथा अशी–

विठोबा हा मल्हारी देवाचा मांडलिक असून माळशिरसला राहात असे. तो प्रजावत्सल होता. एकदा खानदेशचा भक्त माळीराया याने

पाचशे घेऊन विठ्ठलाच्या भेटीला कोल्हापूरहून माळशिरसला येत असल्याचा निरोप पाठविला. विठ्ठलाला खूप आनंद झाला. त्याने सोम्या प्रधानामार्फत पदूबाईला माळीराया व भक्तांच्या जेवणाची तयारी करण्याचा आदेश दिला. परंतू तो आदेश धुडकावून पदूबाईने माळीरायाचा अपमान केला. हे कळताच विठ्ठलाला खूप दुःख वाटून त्याने तिला शाप दिला. तळ्यावर पाण्यास गेल्यानंतर तिची सोन्याची घागर बुडून ती वेडी होऊन फिरेल. तिला कोणी आश्रय देणार नाही. ती रानात एकटी मरेल, तिच्या प्रेताला कोणी शिवणार नाही. मायेच्या आप्तस्वकीय माणसांची सावलीही तिच्या प्रेतावर पडणार नाही. असा विठ्ठलाने तिला शाप दिला. शापाप्रमाणे तिची घागर बुडाली, ती वेडी होऊन रानात मरून पडली. गुरेराखी मुलांनी तिचे वडील जनकोजी पाटील व आई कमळजा यांना तिच्या मृत्यूची वार्ता सांगितली. पण तिच्या वडिलांचा विश्वास बसला नाही. समर्थ विठ्ठलाची राणी रानात एकटी कशी मरेल ? असा प्रश्न त्यांना पडला. सर्वजण जंगलाकडे धावले, विठ्ठलाने वाटेत नाग घेऊन सर्वांना अडविले. घारी, गिधाडांनी तिचे प्रेत खाल्ले. खूप मोठा पाऊस आला, त्यात पदूबाईची हाडे समुद्रास वाहून गेली. ही हकीकत ऐकून माळीराया दुःखी झाला. 12 वर्षे तप करून समुद्राकडून पदूबाईच्या अस्थी त्याने परत मिळविल्या. समुद्राने त्या अस्थी चंद्रभागेत टाकायला सांगितल्या. माळीरायाने त्या चंद्रभागेच्या (भीमेच्या) काठावरील पद्मतीर्थ तळ्यात टाकल्या. तिथे एक कमळ उगवले.

पद्मावतीच्या विरहाने विठोबा राज्य सोडून भटकात चंद्रभागेच्या तीराजवळ आला. तेथे त्याला हे सुंदर कमळ दिसले. ते त्याने तोडून घेतले. त्याबरोबर कमळ गेले आणि पदूबाई उभी राहिली. पण आता तिचे नाव पदूबाई नव्हते, ती रूक्मिणी झाली. तिचा विठ्ठलाशी संसार तुटला तो तुटलाच. आपण एकत्र राहायचे नाही. रोज भेटू, बोलू, भक्तांचे भले करू, असे तो रूक्मिणीस म्हणाला. तेंव्हापासून त्यांची मंदिरे वेगवेगळी झाली.[9] या कथेची साक्ष देणारे पद्मतीर्थ तळे व पद्मावतीचे मंदिर आजही पंढरपूरात आहे. नामदेवांनी पंढरीतील पद्मतीर्थाचे महात्म्य सांगताना म्हटले आहे की,

"कार्तिकाचे आदित्यवारी । जो पद्माला स्नान करी ।।
त्यासी नाहीं येरझारी । नये पुढतीं संसारा ।।"[10]
"निरेभिवरे ऐक्य तीरीं । कां पद्माळा पंढरपुरीं ।।
केलिया रविवारीं आंघोळी । महा दोषां होय होळीं ।।"[11]
"वाराणसी माधवबिंदू । पांडुरंगीं वेणूनादू ।।
पंचक्रोशी तीर्थ उदंडू । पांडुरंगी पद्मतीर्थ ।"[12]

मराठी लोकगीतामध्येही पद्मावती व पद्मतीर्थ तळ्याचा उल्लेख येतो.

"रूसली रूक्मिणी । गेली पद्म तळ्याला ।
सावळा पांडुरंग । हात घाली गळ्याला ।।"[13]

'श्री पांडुरंग महात्म्य कथासार' ग्रंथात द्वापार युगातील विंध्य पर्वताच्या पूर्वेस राहणाऱ्या चंद्रसेन राजाच्या रूपमती पद्मा नामक कन्येची कहाणी आली आहे. गुरू वैशंपायन यांच्या सल्ल्याने पद्मा पंढरपूरात भीमा व शरावती यांच्या संगमावरील पांडुरंगाच्या भेटीस आली. पांडुरंगास पाहून ती कामोत्तेजित झाली. विठ्ठलास तिने आपला पती होण्याचा वर मागितला. विठ्ठलाने तिचे गर्वहरण करून तिला आशीर्वाद दिला.[14] जिज्ञासूंनी ही कथा मुळातून वाचावी. या कथेतील पद्मा व पदूबाई असलेला संबंध विस्मृत तरी झाला नसेल ना ? हे मुळातून पाहणे जरूरीचे ठरेल.

पद्मावतीच्या पद्मतीर्थाची महात्म्य सांगणारी सुशर्मा ब्राह्मणाची कथा 'पंढरी महात्म्य' या ग्रंथात सांगितली आहे. त्याने पद्मतीर्थामध्ये स्नान केल्याने त्याची पापे नष्ट होवून त्यास विष्णुलोक मिळाला.[15]

दुर्गाबाईंनी सांगितलेल्या विठ्ठल–पदूबाईच्या कथेशी समांतर जाणारे व काही संदर्भ बदल असलेले देसरे एक धनगरी कथागीत डॉ. रा.चिं.ढेरे यांच्या 'विठ्ठल : एक महासमन्वय' या पुस्तकात परिशिष्टात दिले आहे. त्यामध्ये विठ्ठल ब्रमल ( विठ्ठल, बिरूदेव ) हे दोघे बंधू व त्यांनी अंगच्या मळापासून तयार केलेला सोमा मालदार हा त्यांचा तिसरा बंधू होता. दुर्गाबाईंच्या धनगरी कथागीतात सोमा हा विठ्ठलाचा प्रधान असल्याचा व माळीराया हा खानदेशातील लाडका भक्त असल्याचे सर्वज्ञात आहेच. विठ्ठल हा माणदेशातील असल्याचा उल्लेख 'श्री विठ्ठल : एक महासमन्वय' या ढेरे यांच्या ग्रंथातील परिशिष्टातील पृष्ठ क्र. 383 वरील लोकगीतात सांगितले आहे. डॉ.ढेरे यांनी दिलेल्या कथा गीतातील संदर्भ अधिक अचूक वाटतात.

गायी, म्हैशी, शेळ्या, मेंढ्या राखणारे व त्यांचे दूध विकणारे धनगर म्हणजेच गवळी लोक. त्यांच्या बायकांना गवळण म्हणण्याचा सामाजिक प्रघात होता. विठ्ठलाची पदूबाई ही राणी असली तरी त्याची पत्नी म्हणून धनगरी रूढ अर्थाने तिचा गवळण असा आलेला उल्लेख अधिक सार्थ व मूळ परंपरेशी नाते जोडणारा आहे.

"पदुया बा गवळण । गवळणीला सराफ ।
खुळी गा येडी होशील । धोंडे दगड मारशील । गावातल्या पोरांला ।।"[16]

डॉ.ढेरे यांनी दिलेल्या कथागीतात विठ्ठलकन्या भागू म्हणजे भागिरथी हिचे दुःख मांडून कथेला वेगळीच उंची प्राप्त केली आहे.

पंढरपूर पंचक्रोशीतील काही तीर्थक्षेत्रे संत ज्ञानेश्वर, संत नामदेवांच्या काळापूर्वी अस्तित्वात होती व आजही ती आहेत. त्यांचा महिमा महाराष्ट्रात सर्वत्र गायला जात होता. येथील प्रत्येक तीर्थस्थळामागे काही इतिहास व भौगोलिक वैशिष्ट्ये आहेत. पद्मतीर्थ हे पंढरपूरातील अनेक तीर्थस्थळांपैकी एक आहे. या तळ्याचे बांधकाम इ.स. 1778 मध्ये सरदार यशवंतराव पवार ( धार ) यांनी केले असल्याचा उल्लेख

सापडतो.[17] या तळ्याचे बांधकाम जरी अलिकडचे असले तरी मूळचे तळे खूपच प्राचीनकालीन आहे. पंढरपूरात आज पदूबाई म्हणजे पद्मावती ही लोकदेवी भव्य शेंदरी तांदळ्याच्या रूपात पूजली जात आहे.

भारत इतिहास संशोधक मंडळाच्या वार्षिक इतिवृत्तातांत शके 1836 व 1837 साली श्री.वा.दा. मुंडले यांनी प्रकाशित केलेल्या धनगरी गीतांकडे अभ्यासकांनी दुर्लक्ष केले. त्यामुळे विठ्ठलाचे अवतारित्व व तो कोणामुळे पंढरपूरला आला, हे विषय वादविषय बनून राहिले. याविषयी मत मांडताना डॉ.रा.चिं.ढेरे म्हणतात, " विठ्ठल संशोधनातील ही भ्रांत अवस्था मुळीच समर्थनीय ठरणारी नाही. या विषयावर लिहायला प्रवृत्त होणाऱ्या संशोधकांनी अत्यंत मौलिक अशा उपलब्ध सामुग्रीची कमालीची उपेक्षा केल्यामुळेच ही भ्रांत अवस्था आजवर टिकून राहिली आहे."[18]

पदुबाई व विठ्ठल यांची धनगरांनी जतन करून ठेवलेली करूणरम्य कथा दुर्गाबाईंना खूपच मौलिक वाटल्याने त्यांनी तिच्यावर भाष्य केले आहे. 'पैस' मधील प्रस्तुत लेखात दुर्गाबाईंनी गरीब ब्राह्मणाच्या तुळशी नामक मुलीची दुसरी कथा सांगितली आहे. त्यात विठ्ठलाने तुळशीला प्रिय मानून तिचा उद्धार कसा केला आहे, हे सांगितले आहे.

या दोन्ही कथांविषयी दुर्गाबाई म्हणतात, "कथा खऱ्या नसतीलही. परंतु त्यांच्यामागचे काव्यमय सत्य, अविचल आहे. त्यानेच माझी पकड घेतली. विठोबाचे मानव्य अधिकाधिक भावू लागले. आलेल्या सुखाकडे, प्रेमाच्या पूर्तीकडे, जन्मोजन्मीच्या मोहाकडे विठोबा पाठ फिरवितो. तो देवमाणूस म्हणून चिंरतन दुःखाचे आवाहन करतो, ते आटू देत नाही. सुखाच्या वरदानाहून, कर्तव्याचा व सत्याचा रंग असलेले दुःख अधिक सुफळ असते. तीच सुफळता विठोबाच्या आणि रूक्मिणीच्या कायम अंतरात येथे आढळते."[19]

पंढरपूरात येऊन विठ्ठलाचे व चंद्रभागेचे दर्शन घेऊन परतताना गावाच्या सीमेवर भेटलेल्या काळ्या व धष्टपुष्ट धनगरात दुर्गाबाईंना विठ्ठलाचे खरे दर्शन घडते. निर्गुण निराकार विठ्ठल धनगरांच्या रूपाने सगुण साकार झाल्याची अनुभूती त्यांना आली. भेटलेला काळा धनगर आणि विठ्ठल त्यांच्या देह व रूपात दुर्गाबाईंना एकत्व आढळले. सजीव तेच स्वाभाविक असते आणि स्वाभाविक तेच खरे सुंदर असते आणि ते सौंदर्य कळायला तुकारामांसारखे निष्पाप कविमन लागते. विठ्ठलाच्या काळ्या कुरूप मूर्तीला तुकारामांनी 'सुंदर ते ध्यान' असे का म्हटले. त्याचा अनाकलनीय उलगडा दुर्गाबाईंना झाला. त्यातूनच पंढरीच्या विठोबाचे आणि त्यांचे पिढ्यांचे आंतरीक नाते नव्याने उजळले. "नामा म्हणे सर्व भक्षितो हा काळु । भक्तांचा कृपाळु श्रीविठ्ठल ।।"[20] संत नामदेवांनी विठ्ठलाचा लडिवाळपणे केलेला 'काळु' हा उल्लेखही भावसौंदर्याची अनोखी अनुभूती देतो.

दुर्गा भागवत, डॉ.रा.चिं.ढेरे यांनी विठ्ठलाच्या मूळ रूपावर व परंपरेवर टाकलेला प्रकाशझोत महत्त्वाचा आहे. या संशोधनावर वरील द्वयींच्या मनात अहंकारी दुराग्रह नाही. अहंकारी आग्रहही नाही. विश्वास जरूर आहे. लोकसाहित्यात लोकसंस्कृतीतील अनेक ऐतिहासिक सत्ये अभावितपणे नोंदली गेलेली असतात. 'पैस' मधील 'पंढरीचा विठोबा' या लेखातील दुर्गाबाईंचे विठ्ठल विषयक मुक्त चिंतन लोकसाहित्य व लोकसंस्कृतीच्या अभ्यासकांना नवी उभारी देणारे आहे. डॉ.रा.चिं.ढेरे यांचे 'श्री विठ्ठल : एक महासमन्वय' हे संशोधनरूपी पुस्तक दुर्गाबाईंच्या मांडणीला अधिक गडदता मिळवून देणारे ठरले आहे. एका दैवतकथेचे आणि स्थान महात्म्याचे डॉ.ढेरे यांचे संशोधन लोकपरंपरेतल्या स्त्रीगीतांनी नोंदविलेले, सांभाळलेले लक्षात आले की, अभिजात संशोधनाला लोकप्रतिभा कशी भिडते याचे नवल वाटत राहते.[21]

संतांच्या ऐतिहासिक पुंडलिक–पांडुरंग परंपरेला छेद देणारी पद्मावतीची लोककथा, पद्मसरोवराचे प्राचीन ग्रंथांतील, लोककथा व लोकगीतांतील संदर्भ, पाप नष्ट करणारे पुण्यस्थान म्हणून पद्मतीर्थाचे महात्म्य लोकमानसाला व संतजनांनाही मान्य आहे. त्यामुळे दुर्गाबाईंच्या दुसऱ्या विठ्ठल विषयक सूत्रास दुजोरा मिळतो. दुर्गाबाईंचे 'पैस' मधील विठ्ठल विषयक चिंतन नव्या संशोधनाला दिशा देणारे व गाडलेल्या विस्मृत परंपरेला उजाळी प्राप्त करून देणारे आहे. त्यामुळेच ते मौलिक चिंतन ठरते.

## *संदर्भ सूची*


1. डॉ. वाडेकर अरूण शं. : 'श्री क्षेत्र पंढरपूर दर्शन', मे. संस्कृती ग्रंथ भांडार, पुणे. प्र.आ.1996. पृष्ठ क्र.5
2. प्रा.डॉ.सौ.रणनवरे जयश्री : सांस्कृतिक वैभव' अक्षरलेणं प्रकाशन, सोलापूर. प्र.आ.2006.पृष्ठ क्र 6
3. भाटे प्र.कृ. : 'बरवे–बरवे पंढरपूर', पांडुरंग प्रकाशन, पुढरपूर. प्र.आ.25 डिसेंबर, 2000. पृष्ठ क्र.4
4.डॉ.ढेरे रा.चिं. : ' विठ्ठल : एक महासमन्वय', पद्मगंधा प्रकाशन, पुणे. प्र.आ.21जुलै, 2012. पृष्ठ क्र.52,53
5. तत्रैव – पृष्ठ क्र. 298
6. भागवत दुर्गा : 'पैस', मौज प्रकाशन गृह, मुंबई, सहावी आवृत्ती – 2008. पृष्ठ 32
7. तत्रैव –पृष्ठ क्र. 38
8. डॉ. गोविलकर लीला : 'विठ्ठल : विठोबाचे उन्नयन', 'युगबोध' श्री विठ्ठल विशेषांक– 2001–02, पृष्ठ क्र. 148
9.भागवत दुर्गा : 'पैस', मौज प्रकाशन गृह, मुंबई. सहावी आवृत्ती– 2008, पृष्ठ क्र. 38,41
10. तत्रैव – पृष्ठ क्र. 42
11. श्री नामदेवांची गाथा – गीताप्रेस, गोरखपूर. अभंग क्र. 443. ब 65
12. तत्रैव – अभंग क्र. 412. पृष्ठ क्र. 61
13. संपादक डॉ. बाबर सरोजिनी : 'दसरा – दिवाळी', महाराष्ट्र लोकसाहित्य समिती, प्रथम आवृत्ती – नोव्हेंबर, 1990 पृष्ठ क्र. 570
14. गोवंडे श्रीकांत : 'श्री पांडुरंग महात्म्य कथासार', सारथी प्रकाशन, पुणे. पृष्ठ क्र. 12
15. धारूकर विठ्ठल दाजीशास्त्री (मूळ लेखक) : 'पंढरी महात्म्य', संपादक वा.ल.मंजुळ, पृष्ठ क्र. 38
16. डॉ.ढेरे रा.चिं. : 'विठ्ठल : एक महासमन्वय', पद्मगंधा प्रकाशन, पुणे. प्रथम आवृत्ती – 21 जुलै, 2012. पृष्ठ क्र. 389, 390
17.तत्रैव – पृष्ठ क्र. 389
18. डॉ. बेणारे गोपाळ : 'सचित्र पंढरीचा राणा', श्री संत सेवा वाङ्मय प्रकाशन, पंढरपूर. प्र.आ. 1993, पृष्ठ क्र. 17
19. डॉ.ढेरे रा.चिं. : 'विठ्ठल : एक महासमन्वय', पद्मगंधा प्रकाशन, पुणे. प्रथम आवृत्ती – 21 जुलै, 2012. पृष्ठ क्र 299

20. श्री नामदेवांची गाथा : गीताप्रेस, गोरखपूर. अंभग क्र. 348, पृष्ठ क्र. 51
21. डॉ. भवाळकर तारा : 'संस्कृतीची शोधयात्रा', पद्मगंधा प्रकाशन, पुणे. प्र.आ. जुलै, 2005. पृष्ठ क्र. 264

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net